

# लोककला कोलम



कोलम हा तामिळनाडूमधील 5000 वर्षांपासून चालत आलेला लोकप्रिय नक्षीकामाचा प्रकार आहे. कोलमची नक्षी जमिनीवर पूजास्थानी किंवा घराच्या मुख्य दरवाजाशी काढली जाते. कौतुक वाटण्याजोगी ही नक्षी सहजपणे काढली जाते. यासाठी तांदळाची पिठी किंवा रांगोळीचा वापर केला जातो. त्यामुळे ती बहुधा पांढऱ्या रंगाची असते. अंगठा आणि पहिल्या बोटाच्या चिमटीत पीठ घेऊन रेघांची नक्षी काढण्यापूर्वी ठिपके काढले जातात. ठिपक्यांच्या चौकटीच्या आधाराने ही नक्षी काढली जाते.